अर्ज निशाणी क्रमांक २५ वर आदेश
(पारीत केल्याचा दिनांक ०२.०३.२०२४)

०१. प्रस्तूत अर्ज वादीने ग्रामविकास अधिकारी, आलमला तालुका औसा यांना ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५६६, ५६७ व ५६८ या घराच्या ८/अ उतारामध्ये मालमत्ता रजिस्टरला नोंद कशा आधारे आले त्याबाबतचे मूळ रेकॉर्ड, मालमत्ता रजिस्टर, ग्रामपंचायत ठराव इत्यादी रेकॉर्ड घेवून साक्ष देण्यासाठी साक्ष समन्स काढण्यासाठी दाखल केला आहे.

०२. **प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की,**

वादीने ज्या कागदपत्रावर साक्ष समन्स काढणेचा अर्ज दिला आहे, तो कागदपत्र प्रस्तूत प्रकरणात दाखल नाहीत. म्हणून अर्ज खारीज करावा अशी विनंती केली.

०३. वादींतर्फे विधिज्ञ **श्री. एस. सी. बिराजदार** आणि प्रतिवादींतर्फे विधिज्ञ **श्री. ए. व्ही. पवार** यांचा युक्तिवाद ऐकला.

०४. वादीच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामविकास अधिकारी, आलमला तालुका औसा यांनी मालमत्ता क्रमांक ५६६, ५६७ व ५६८ या घराच्या ८/अ उतारामध्ये मालमत्ता रजिस्टरला नोंद कशा आधारे घेतली त्याबाबतचे मूळ रेकॉर्ड, मालमत्ता रजिस्टर, ग्रामपंचायत ठराव इत्यादी रेकॉर्डमुळे समजणार आहे. म्हणून ग्रामविकास अधिकारी, आलमला तालुका औसा यांची साक्ष नोंदविणे आवश्यक आहे. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

०१. अर्ज **नि.क्र.२५** मंजूर करण्यात येतो.

०२. वादींनी साक्ष भत्ता भरल्यावर ग्रामविकास अधिकारी, आलमला तालुका औसा यांना मालमत्ता क्रमांक ५६६, ५६७ व ५६८ या घराच्या ८/अ उतारामध्ये मालमत्ता रजिस्टरला नोंद कशा आधारे घेतली त्याबाबतचे मूळ रेकॉर्ड, मालमत्ता रजिस्टर, ग्रामपंचायत ठराव इत्यादी रेकॉर्ड घेवून साक्षकामी हजर राहण्यास साक्षसमन्स काढावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.03.03 15:56:09 +0530

(श्री. सुभाष ल. फुले.)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.
जिल्हा लातूर.

दिनांक :– ०२.०३.२०२४.
ठिकाण :– औसा.